**महाराष्ट्र पर्यटन प्रसिद्धीच्या बाबींवरील खर्चासाठी सन २०१८-१९ या वर्षाकरिता मुख्यलेखाशिर्ष “प्रसिध्दी (३४५२१९३१)” याखालील उपलब्ध अनुदानातून निधी वितरीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,**
**शासन निर्णय, क्रमांक : टीडीसी २०१९/१/प्र.क्र. ८१/पर्यटन,**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०१ मार्च, २०१९.

<u>वाचा :</u>
१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- मावज-२०१५/प्र.क्र. ३२७/३४, दिनांक ६.१०.२०१५.
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- मावज-२०१६/प्र.क्र. ५६/३४, दिनांक ३०.३.२०१६.
३. शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्रमांक- टीडीसी २०१५/११/प्र.क्र. १०२१/ पर्यटन, दिनांक ४.५.२०१६.
४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- मावज-२०१६/प्र.क्र. ३९७/३४, दिनांक ५.१.२०१७.
५. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- मावज-२०१७/प्र.क्र. १५३/३४, दिनांक २१.७.२०१७.
६. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक- अर्थसं २०१८/प्र.क्र. ६९/अर्थ-३, दिनांक २.४.२०१८.
७. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक- अर्थसं २०१८/प्र.क्र. ६९/अर्थ-३, दिनांक २५.१.२०१९.
८. शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्रमांक- महोत्सव २०१८/११/प्र.क्र. ११२६/ पर्यटन, दिनांक ७.१.२०१९.
९. शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्रमांक- टीडीसी २०१९/१/प्र.क्र. ८१/ पर्यटन, दिनांक २८.१.२०१९.
१०. शासन शुध्दीपत्रक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्रमांक- टीडीसी २०१९/१/प्र.क्र. ८१/ पर्यटन, दिनांक २८.१.२०१९.

**<u>शासन निर्णय</u> :**

विविध आंतरराष्ट्रीय/ राष्ट्रीय/ राज्य स्तरावर आयोजित केलेल्या प्रदर्शने, महोत्सव व इतर अनुषंगिक कार्यक्रमांमध्ये महाराष्ट्र पर्यटनाच्या प्रसिध्दी व वृध्दीसाठी पर्यटन विभाग आणि/ किंवा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ सहभागी होतात व त्याकरिता आर्थिक प्रायोजकत्व देण्यात येते. याकरिता संदर्भाधीन क्रमांक- ८ येथील दिनांक ७.१.२०१९ च्या शासन निर्णयानुसार पर्यटन विभागाकडून प्रायोजकताद्वारे वित्तीय सहाय्य देणे यासाठी योजनेस मान्यता देण्यात आलेली आहे.

२. महाराष्ट्र राज्यातील पर्यटन स्थळांची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिध्दी व त्याच्या विकासास उत्तेजन देणे, निरनिराळे पर्यटन महोत्सव साजरे करणे यासाठी सन २०१८-१९ या वित्तीय वर्षात मुख्यलेखाशिर्ष "प्रसिध्दी (३४५२ १९३१)" याखाली रुपये ७८.०० कोटी नियतव्यय अर्थसंकल्पित आहे. वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक- ७ येथील दिनांक २५.१.२०१९ च्या शासन परिपत्रकान्वये अर्थसंकल्पित नियतव्ययापैकी ७०% म्हणजेच रुपये ५४.६० कोटी इतका निधी वितरणासाठी उपलब्ध आहे. सदर निधीपैकी रुपये ३८२७.४२ लक्ष निधी वितरणासाठी शिल्लक आहे.

३. प्रचलित कार्यपध्दतीनुसार "प्रसिध्दी" खालील निधीच्या खर्चाबाबत वार्षिक प्रसिध्दी आराखड्यास मान्यता देऊन महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास निधी वितरीत करण्यात येतो व प्रसिध्दीबाबतच्या बाबींवरील खर्चास शासनाची मान्यता प्रदान केल्यावर संबंधित आयोजक/ संस्था यांची देयके अदा करण्यात येतात. पर्यटन विभाग आणि/ किंवा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ पर्यटन विषयक प्रसिध्दी कार्यक्रमांमध्ये सहभागी झालेल्या व शासनाने खर्चास मान्यता दिलेल्या कार्यक्रमांची देयके प्रलंबित रहात असल्यामुळे, तसेच आगामी कालावधीत प्रदर्शने, महोत्सव व अनुषंगिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होणे व अशा कार्यक्रमांना प्रायोजकत्व देण्यासाठी उर्वरित निधी वितरीत करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे "प्रसिध्दी (३४५२ १९३१)" अंतर्गत वितरणासाठी उपलब्ध असलेला रुपये ३८२७.४२ लक्ष (अक्षरी रुपये अडोतीस कोटी सत्तावीस लक्ष बेचाळीस हजार फक्त) इतका निधी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास याद्वारे वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने प्रसिध्दी आराखड्यानुसार केलेली तरतूद विहीत प्रक्रिया राबवून, मा.मंत्री, पर्यटन तथा अध्यक्ष, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांच्या मान्यतेने निधी खर्च करावा.

५. प्रमाणित करण्यात येते की, वित्त विभाग शासन परिपत्रक दिनांक २.४.२०१८ च्या परिच्छेद ६ ते ७ मधील प्रत्येक अटीची खालील प्रमाणे पुर्तता करण्यात आली आहे. परिच्छेदनिहाय तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | परिपत्रकातील परिच्छेत क्र. | विषय | विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | ६ (अ) | एखाद्या कार्यक्रमास/ प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देणे | प्रशासकीय विभाग असलेल्या अधिकाराअंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. |
| २ | ६ (ब) | अर्थसंकल्पिय तरतूद करणे आवश्यक असते. | अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध आहे. |
| ३ | ६ (क) | एखाद्या कार्यक्रम/ प्रकल्पाच्या खर्चाच्या बाबतीस प्रशासकीय मान्यता, खर्चासाठी उपलब्ध तरतूद व खर्च मंजूरीचे विभागास असलेले वित्तीय अधिकार | प्रस्तावित निधीच्या अनुषंगाने प्रशासकीय मान्यता देण्यात आहे.<br>खर्चासाठी तरतूद उपलब्ध आहे.<br>वित्तीय अधिकार नियम |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | पुस्तिका, १९७८ भाग- पहिला, उप विभाग एक अ.क्र. २७ नियम क्र. १४९ नुसार प्रशासकीय विभागांला असलेले अधिकार पूर्ण अधिकार आहे. |
| ४ | ७ | प्रशासकीय विभागांना वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-१ वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक- विअप्र-२०१३/प्र.क्र. ३०/२०१३/विनियम, दिनांक १७.४.२०१५ अन्वये अधिकार असणे | वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग- पहिला, उप विभाग एक अ.क्र. २७ नियम क्र. १४९ नुसार प्रशासकीय विभागांला पूर्ण अधिकार आहे. |
| ५ | ७(१)(अ) | विविध शासकीय / प्रशासकीय संस्थांना तसेच अनुदानित संस्थांना सहायक अनुदाने मंजूर करण्यापूर्वी त्यांचेकडून पूर्वी खर्च केलेल्या अनुदानाची उपयोगिता प्रमाणपत्रे प्राप्त करुन घेणे | वेळोवेळी प्राप्त करुन घेण्यात येतात. |
| ६ | ७(१)(आ) | वेतन अनुदान लाभार्थ्यांच्या बँक अकाऊंटमध्ये ECS द्वारे प्रदान करणे बंधनकारक राहील | सदर अनुदान सहायक अनुदाने (वेतनेतर) आहे. लागू नाही. |
| ७ | ७(२) | स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदाने | लागू नाही. |
| ८ | ७(३) | वैयक्तिक लाभार्थीच्या योजनेची देयके | लागू नाही. |
| ९ | ७(४) | शिष्यवृत्ती / शिक्षणशुल्काची प्रतिपूर्ती, वैयक्तिक लाभार्थी यांची प्रदाने | लागू नाही. |
| १० | ७(५) | बांधकाम विषयक प्रस्तावासंदर्भात प्र.मा./तां.मा. तसेच आवश्यक तेथे सचिव समितीची मान्यता | लागू नाही. |
| ११ | ७(६) | केंद्र पुरस्कृत योजनेसंदर्भात केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाल्याची खात्री वित्त विभागाकडून करुन घेणे | केंद्र पुरस्कृत योजना नाही. लागू नाही. |
| १२ | ७(७) | खरेदीबाबत उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांचे पालन करुन खरेदीची देयके कोषागारातून आहरित करण्यात यावीत. | लागू नाही. |
| १३ | ७(८) | विभागाद्वारे संक्षिप्त देयकाद्वारे निधी खर्च करण्यात येतो. त्याचे तपशीलवर देयक सादर न केल्यामुळे लेखा आक्षेप येतात व अपहार संभवतात. | लागू नाही. |
| १४ | ७(९) | विविध कारणांमुळे अखर्चित राहिलेला निधी विभागांची त्यांच्या अधिनस्त महामंडळाकडे हस्तांतरीत करुन तांत्रिकदृष्टया खर्च झाल्याचे दाखविले जाते. अखर्चित निधी बँकेमध्ये ठेवल्यास त्याचे बँक अकाऊंट स्टेटमेंट सादर करणे. | लागू नाही. |

६. तसेच वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक- अर्थसं-२०१८/प्र.क्र. ६९/अर्थ-३, दिनांक २.४.२०१८ च्या परिशिष्टामधील तपासणी सूचीबाबतील अनुक्रमांक १ ते ४ ची पुर्तता करण्यात आली आहे. अ.क्र. ५ बाबत स्पष्ट करण्यात येते की, लेखापरिक्षक / महालेखापाल यांचे कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत. यापूर्वी या कामांसाठी निधी वितरीत केलेला नाही. त्यामुळे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

७. खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास रुपये ३८२७.४२ लक्ष अदा करण्यास शासन याद्वारे मान्यता देत आहे :-

<u>अटी व शर्ती</u> :-

१) सन २०१८-१९ च्या प्रसिद्धी आराखड्यास मान्यता प्राप्त होईपर्यंत पर्यटन प्रसिध्दीसाठीचा खर्च भागविण्यासाठी रुपये ३८२७.४२ निधी वितरीत करण्यात येत आहे. प्रसिध्दीकरिता मंजूर करण्यात आलेला निधी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने प्रस्तावित प्रसिध्दी आराखड्याप्रमाणे खर्च करावा. **सदर खर्च** विहीत प्रक्रिया राबवून व मा.मंत्री, पर्यटन तथा अध्यक्ष, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांच्या मान्यतेने करावा. निधीवर जमा होणारे व्याज खर्च करण्यास शासनाची मान्यता घेण्यात यावी.

२) ज्या संदर्भात निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे त्या प्रत्येक योजनेच्या संदर्भात वित्तिय अधिकाराच्या प्रत्यावर्तनानुसार सक्षम प्रशासकीय व वित्तिय मान्यता घेणे आवश्यक आहे.

३) वितरीत केलेल्या निधीतून खर्च करताना वित्तीय नियमांचे आणि विविध नियमांतर्गत विहीत केलेल्या कार्यपध्दतीचे पालन करण्यात यावे.

४) कोणत्याही परिस्थितीत मंजूर अनुदानापेक्षा जास्त खर्च होणार नाही, याबाबतची सर्व जबाबदारी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांची राहील व जादा खर्चाची प्रतिपुर्ती शासनाकडून केली जाणार नाही.

५) अशा प्रत्येक योजनेबाबत करावयाच्या बांधकामासंदर्भात अथवा खरेदीबाबत किंवा सेवा पुरवठा कराराबाबत वित्तीय नियमांप्रमाणे आवश्यक ती कार्यपध्दती पाळणे आवश्यक आहे. या संदर्भात शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र-संकीर्ण-१००२/प्र.क्र.१५/कोषा-प्र ५, दि. ६ फेब्रुवारी, २००२ च्या सूचनांचे काटेकोरपणे पालन होईल, याची खबरदारी संबंधित अंमलबजावणी यंत्रणेने घ्यावी. तसेच शासन निर्णय वित्त विभाग क्र.बीजीटी-१०.००/प्र.क्र.५६/२०००/वित्तीय सुधारणा दिनांक १० सप्टेंबर,२००१ मधील उपाययोजनांची अंमलबजावणी तंतोतंतपणे करण्यात यावी.

६) या शासन निर्णयात वाचा:- समोर नमूद सामान्य प्रशासन विभागाच्या त्यांच्या संदर्भाधीन शासन निर्णयान्वये शासकीय जाहिरात वितरण धोरण व त्यात वेळोवेळी सुधारणा करुन आदेश निर्गमित केलेले आहेत. या आराखड्याची अंमलबजावणी करतांना सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात यावी.

७) प्रसिध्दीबाबतच्या खर्चाच्या प्रत्येक बाबीबद्दल संदर्भाधीन क्रमांक- ६ येथील दिनांक ७.१.२०१९ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेले धोरण व त्यामधील अटी व शर्तीस अनुसरुन कार्यवाही करण्यात यावी.

८) केवळ तरतूद उपलब्ध आहे म्हणून खर्च करण्यात येऊ नये.

९) कोणतीही बांधीलकी (commitment) स्विकारण्यापूर्वी त्या कार्यक्रम/उपक्रम/कार्यवाहीतुन काय लाभ होईल याची काय क्षमता आहे ते प्रथम काळजीपूर्वक तपासण्यात यावे, त्याची लेखी नोंद ठेवण्यात यावी व कार्यक्रम/उपक्रम/कार्यवाही झाल्यानंतर त्याची पडताळणी करुन त्याचा तपशिल महामंडळाच्या अभिलेखावर ठेवण्यात यावा.

१०) सदर रक्कमेच्या खर्चाचा महालेखापाल कार्यालयाशी ताळमेळ घालून अहवाल शासनास सादर करावा. यासाठी होणारा खर्च मागणी क्रमांक झेडडी - ४, "३४५२-पर्यटन', ०१-पर्यटनासाठी पायाभूत सुविधा, १०१-पर्यटन केंद्रे (०२) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना (०२) (०४) प्रसिध्दी (३४५२१९३१) ३१, सहायक अनुदान (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पित तरतूदीतून भागविण्यात यावा.

११) या आदेशान्वये मंजूर करण्यात आलेली सहायक अनुदानाची रक्कम आहरीत करुन संबंधितांना वितरीत करण्याकरिता श्री.र.ल.लखोटे, कार्यासन अधिकारी, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून व श्री.सु.भि. पाटणकर, सह सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांना नियंत्रक म्हणून घोषित करण्यात आले आहेत. त्यांनी वरील निर्णयानुसार मंजूर करण्यात आलेल्या सहायक अनुदानाची रक्कम अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई येथून आहरीत करुन महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

१२) सदर निधी "कक्ष अधिकारी, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय,मुंबई" (Desk Officer, Tourism and Cultural Department, Mantralaya, MUMBAI) या नावे E.C.S. द्वारे उपलब्ध करुन देण्यात यावा.

१३) हा शासन निर्णय, वित्त विभाग परिपत्रक क्र.अर्थस-२०१६/प्र.क्र.८९/अर्थ-३, दि.२०/४/२०१६ तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग- पहिला, उप विभाग एक अ.क्र.२७ नियम क्र.१४९ प्रशासकीय विभागांना दिलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०५१२१८५९०६२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ravindra
Laxmikant Lakhote

Digitally signed by Ravindra Laxmikant Lakhote
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tourism And Cultural Affairs Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=ae5e5678dc8c9d9c01f7043448a53f6a9fbe81e46d183af43c9a9e01eb42c7c7,
serialNumber=93c11f919f0c5fba6953b4841cc8cfd46b2b788da139e3f21b3d79d2cf976efa, cn=Ravindra Laxmikant Lakhote
Date: 2019.03.05 12:22:34 +05'30'

(र.ल.लखोटे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

**प्रति,**

१. मा. मंत्री, पर्यटन यांचे खाजगी सचिव

२. मा. राज्यमंत्री, पर्यटन यांचे खाजगी सचिव

३. सचिव, पर्यटन
४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
५. महालेखापाल, महाराष्ट्र - १, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
६. महालेखापाल, महाराष्ट्र - २, (लेखा परीक्षा /लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
७. महालेखापाल (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा), मुंबई.
८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
११. नियोजन विभाग (कार्यासन-१४११/१४४४), मंत्रालय, मुंबई.
१२. वित्त विभाग (का.व्यय-१४/अर्थोपाय) मंत्रालय, मुंबई.
१३. अवर सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (अर्थसंकल्प शाखा), मंत्रालय, मुंबई.
१४. निवड नस्ती.

***